पथनाट्य

# *बाई कशाला हवी ?*

**प्रल्हाद जाधव**

(दहा-पंधरा तरुणांचा गट अपेक्षित. नसल्यास किमान तीन तरुण आणि एक तरुणी असा चौघांचा गट हे पथनाट्य सादर करू शकेल. प्रयोग सादर करण्यासाठी लेखकाची पूर्वपरवानगी घेणे आवश्यक.)

(काही तरुण रांगेत उभे. त्यातला एक पुढे येतो. ढोलकी वाजवतो)

तरुण १ (ढोलकी वाजवत)
ऐका हो ऐका ऽऽऽ
इकडे लक्ष द्या ऽऽ
याल तर हसाल न याल तर फसाल...
भाईयो ओर बहनो ऽऽऽ
सुनो सुनो सुनो ऽऽऽ
(पुन्हा ढोलकी वाजवत तेच ओरडू लागतो.)

तरुण २ : अरे काय बोंबाबोंब चाललीय तुझी ? कशाला बोंबलतोयस एवढा ?

तरुण १ : ह्याला बोंबाबोंब म्हणत नाहीत.

तरुण २ : मग काय म्हणतात ?

तरुण १ : ह्याला दवंडी असं म्हणतात.

तरुण २ : दवंडी ? ती काय भानगड असते ?

तरुण १ : तुला दवंडी माहीत नाय ?

तरुण २ : नाही.

तरुण १ : दवंडी माहीत नाही ?

तरुण २ : नाही

तरुण १ : अरे जनतेला जाहीरपणे माहिती देण्यासाठी ज्या माध्यमाचा वापर केला जातो तिला दवंडी असं म्हणतात.

तरुण २ : अच्छा, अच्छा... समजलं. म्हणजे तू जनतेला माहिती देण्यासाठी आलायस तर.

तरुण १ : अगदी बरोबर.

तरुण २ : माहिती खात्यात कामाला आहेस का तू ?

तरुण १ : लेका लेका लेका... माहिती देण्यासाठी माहितीखात्याचा काय संबंध ? सरकारनं माहितीचा कायदा पास केलाय त्यामुळं कोणताही माणूस आपल्याला हवी ती माहिती—हवी तेव्हा, हवी त्याच्याकडून मिळवू शकतो, आहेस कुठं तू ?

तरुण २ : असं का ? व्हेरी गूड - व्हेरी गूड... मग तू कोणती माहिती देणार आहेस आता आम्हाला?

तरुण १ : (पुन्हा पहिल्याप्रमाणे) ऐका हो ऐका ऽऽऽ

तरुण २ : अरे, तुझं हे ऐका हो ऐका फार झालं. आता पटकन मुद्यावर ये, नाहीतर मला गुद्यावर यावं लागेल.
(ढोलकीची थाप. रांगेतील तरुण हसतात)

तरुण १ : तर मंडळी आज मी तुम्हाला एक छोटं नाटक करून दाखवणार हाय.

तरुण २ : अरे पण तू आताच म्हणालास ना की माहिती देणार हाय म्हणून ?

तरुण १ : अरे येडा का खुळा तू ? नुस्ती कोरडी माहिती देत राह्यलो तर लोक पळून जातील का नाही आपापल्या घरला ?

तरुण २ : ते बी खरं हाय.

तरुण १ : म्हणून ही माहिती मी नाटकाच्या रुपानं देणार हाय.

तरुण २ : असं होय ? व्हेरी गूड... काय नाव नाटकाचं ?

तरुण १ : बाई कशाला हवी ? (ढोलकीची थाप)

तरुण २ : काय - काय - काय ?

तरुण १ : बाई कशाला हवी ? (ढोलकीची थाप)

तरुण २ : अरेरे... अरेरे...

तरुण १ : काय झालं ?

तरुण २ : बाई कशाला हवी हे जर नाटकाचं नाव असेल तर ते नाटक फ्लॉप झालं म्हणून समज !

तरुण १ : का - का - का ?

तरुण २ : बाई कशाला पायजे म्हणजे एकादशीला खिचडी कशाला पायजे असं म्हणण्यासारखंच आहे.

तरुण ३ : बाई नाही म्हणजे सुपारीशिवाय पान !

तरुण ४ : बाई नाही म्हणजे मिठाशिवाय आमटी

तरुण ५ : बाई नाही म्हणजे पावसाशिवाय छत्री !

तरुण ६ : बाई नाही म्हणजे नालाशिवाय घोडा...

तरुण ३ : बाई नसली तर पाणी कोण भरणार ?

तरुण ४ : भांडी कोण घासणार ?

तरुण ५ : पोरं कोण सांभाळणार ?

तरुण ६ : जेवण कोण करणार ?

तरुण ३ : पाय कोण चेपणार ?

तरुण ४ : म्हणे बाई कशाला हवी ? आम्हाला तुझं नाटक बघायचं नाही. आम्ही चाललो.

तरुण १ : अरे पण मला एक चान्स तर देऊन बघा, असं नाटक तुम्हाला पुन्हा बघायला मिळणार नाही.

तरुण ३ : असं म्हणतोस ? बरं बरं — बघू या काय सांगतोय ते ? देऊ एक चान्स... कर सुरू !

तरुण १ : (गातो. त्याला इतर साथ देतात)
बाई नसती जगामधी तर कसे जन्मला असता ?
कसे जन्मला असता ?
आई नसती घरामधी तर कसे वाढला असता ?
कसे वाढला असता ?

तरुण ३ : बाई जर नसती तर आपण जन्माला आलो असतो का ?

तरुण २ : न्हाय बॉ ऽऽऽ

तरुण ३ : असे घोड्यासारखे वाढलो असतो का ?

तरुण २ : न्हाय बॉऽऽ

(एक दारु प्यायलेला माणूस प्रेक्षकातून पुढे येतो. त्याला चांगली चढलेली)

दारुड्या : ए बाबानो काय बोरिंग नाटक चाललय तुमचं हे ! तुमची बडबड बंद करा आणि आधी बाईला बोलवा.

तरुण १ : पण नाटक अजून सुरुच झालं नाही.

दारुड्या : मग ढोलकी वाजली ती ?

तरुण १ : पब्लिक जमायला पायजे म्हणून वाजवली आम्ही.

दारुड्या : ते काय नाय. ढोलकी वाजली म्हंजे नाटक सुरु झालंच पायंजे, आणि नाटक सुरु झालं की बाई आलीच पायजे. नाटकाच्या सुरुवातीलाच जर बाईची एण्ट्री नसेल तर काय उपयोग त्याचा? नाटक कसं पायजे ?

तरुण १ : कसं ?

दारुड्या : रंगदार, ढंगदार ऽऽऽ

तरुण १ : अरे म्हणजे नेमकं कसं ?

दारुड्या : (लचकून दाखवत) स्टार्टिंगलाच बाई नाचली पायजे ! (ढोलकी)

तरुण १ : पण आमच्या नाटकात बाई न्हाय.

दारुड्या : बाई न्हाय ?

तरुण १ : अज्याबात नाय.

दारुड्या : तुमच्या नाटकाचं नाव काय ?

तरुण १ : बाई कशाला हवी ? (ढोलकी)

दारुड्या : ते बदला आधी.

तरुण १ : आणि काय ठेवू !

दारुड्या : बाई नाचलीच पायजे ! (ढोलकी) बघा कसं हिट होतंय ते मग !

तरुण १ : अरे पण नाटकात बाई नाय तर आणू कुठनं ?

दारुड्या : नाटकात बाई नाय ?

तरुण १ : नाय.

दारुड्या : (चप्पल काढून हातात घेत) ही वहाण घ्या आन् हाना आपल्या तोंडात. पार चव गेली बघा तोंडाची. नशाबी उतरली समदी. आधी ढोलकी वाजली तवा वाटलं — आता बाई नाचनार, रंग भरनार, पन तुमी एकदम इस्कोट केला बघा माझ्या स्वप्नाचा.

तरुण १ : अरे पण बाई नसली एखाद्या नाटकात तर काय बिघडलं ? कशाला प्रत्येक ठिकाणी बाई पायजे?

दारुड्या : नाचायला !

तरुण १ : तेच सांगतोय मी तुम्हाला, नाचायला बाई शिल्लक नाय.

दारुड्या : शिल्लक न्हाय म्हजी ? जगातल्या सगळ्या बायका जमिनीनं गिळल्या का काय ?

तरुण १ : जमीन कशाला गिळील ? त्या गेल्यात कामावर.

दारुड्या : कामावर ? नाचगाणं टाकून दुसरं कंचं काम करत्यात त्या ?

तरुण १ : राष्ट्र उभारणीचं ! (ढोलकीची थाप)

दारुड्या : कसलं ?

तरुण १ : राष्ट्र उभारणीचं !

दारुड्या : (खिशातून बाटली काढून पित) तुमचं मराठी ऐकून सगळी नशा पार उतरुन गेली. म्हणे राष्ट्र उभारणीच्या कामाला गेल्याती बाया...

तरुण १ : खरं सांगतो, बायांनी नाचायचं सोडून दिलंय आता आणि त्या राष्ट्र उभारणीच्या कामाला लागल्यात.

दारुड्या : आपल्याला न्हाय पटत.

तरुण १ : दिल्लीत शीला दीक्षित, उत्तर प्रदेशात उमा भारती, राजस्थानात वसुंधरा राजे शिंदे गादीवर नाही का बसल्या ? शिवाय राबडी देवी आणि मायावती. गेला बाजार इंदिरा गांधी, सोनिया गांधी यांची नावं ऐकलीच असशील तू. ऐक !

(गात)

बाई म्हणजे शक्ती अपुली, माता राष्ट्राची.
बाई म्हणजे शक्ती अपुली, नवीन निर्माणाची.

(सर्वजण साथ देतात)

दारुड्या : हे बघा, तुमी शहरातली मंडळी हिकडं खेड्यात येऊन आमा अडानी मानसांना नको नको ती स्वप्नं दाखवता, डोस्की फिरवता आमची. आमी दमून भागून घरी येतो ते कशासाठी ? बिन बाईचं नाटक बघण्यासाठी ? ते काय नाय. आताच्या आता बाई आणा नाही तर आम्ही चाललो, चला मंडळी.

तरुण १ : अहो असं काय करताय ? थांबा जरा...

दारुड्या : थांबून काय करू ? तुमाला जर बाहेरची बाई मिळत नसंल तर निदान आमच्या गावातली तरी बोलवा एखादी...

तरुण २ : गावातल्या बाया पण सगळ्या कामाला लागल्यात.

दारुड्या : कामाला लागल्यात ?

तरुण १ : हो की.

दारुड्या : काय थापा मारता साहेब, ती शेलारांची कमळी कुठं गेली ?

तरुण १ : ती गेली आंगणवाडी सेविका म्हणून. तिला महिन्याला १४०० रुपये पगार मिळतो.

दारुड्या : पवाराची जानकी ?

तरूण १ : तिनं कामधेनू योजना सुरु केली.

दारुड्या : कामधेनू योजना ?

तरुण १ : जेवणाचे डबे पाठवते ती ऑफिसात, महिन्याला पाच हजार रुपये कमावते.

दारुड्या : साळुंख्याची जनी ?

तरुण १ : ती महिला बचत गटात गेली. तिनं शिवलेले कपडे मुंबई-पुण्याच्या बाजारात जातात, हायेस कुठं तू ? म्हैन्याला धा हजार रुपये मिळवते ती...

दारुड्या : धा हजार ? आन त्ये कसं काय ?

तरुण १ : कसं काय म्हणजे ? माविम मदत करते तिला.

दारुड्या : मा वि म ?

तरुण १ : महिला आर्थिक विकास महामंडळ ! (ढोलकीची थाप)

दारुड्या : आसं व्हय ? आसंल, आसंल... मग सावंताच्या पुष्पाला बोलवा.

तरुण १ : ती गेली कॉलेजात शिकायला ?

दारुड्या : कॉलेजात कशी काय जाईल ? तिच्या घरची गरिबी हाय.

तरुण १ : मुलींच्या प्रियदर्शनी वसतीगृहात सोय झालीय तिची.
तिथं मोफत खाणं पिणं, राहाणं, शिक्षण, सगळं मिळतं मुलींना...

दारुड्या : काय म्हणता काय ?

तरुण १ : तर काय खोटं बोलतो ? मुलींनी शिकावं म्हणून त्याना उपस्थिती भत्ता मिळतो आता. मोफत प्रवास, सैनिकी शाळेत प्रवेश, व्यवसाय प्रशिक्षण, महिलांसाठी खास विद्यापीठ, तंत्रनिकेतनात प्रवेश, पाहिजे ते प्रशिक्षण... तू नुसतं नाव घे... योजना हात जोडून समोर उभी हाय बघ...

दारुड्या : असं व्हय, मग त्या अनाथाश्रमातली मुलगी नाय का ती ...(आठवत) हां, हांड्याची प्रमिला — तिला घेऊन या.

तरुण १ : प्रमिलाचं तर लग्न झालं.

दारुड्या : आतिच्या, ते कसं काय ? पैका कुठनं आला तिच्याकडं ?

तरुण १ : माहेर योजनेतनं १५ हजार रुपये मिळाले तिला. दणक्यात लग्न लावून दिलं सरकारनं. सोन्याचं मंगळसूत्र आणि भांडीकुंडी दिली...

दारुड्या : अररं...आता लग्न पन लावून द्याया लागलं सरकार. डोकं ठिकानावर दिसत न्हाय सरकारचं... (दारु पितो) बरं असं करा...

तरुण १ : काय ?

दारुड्या : त्या आन्सुयेला तरी बोलवा.

तरुण १ : कोन आन्सुया ?

दारुड्या : देवदासी ती...

तरुण १ : म्हणजे, देवदासी प्रथा बंद करण्यासाठी कायदा होतोय ते तुला माहीत नाय ? आन्सुया आता सन्मानानं आपलं नवं जीवन जगायला लागलीय.

दारुड्या : पर तिचं रोजचं चालतं कसं मग ?

तरुण १ : महिन्याला ३०० रुपये निर्वाह भत्ता मिळतो तिला सरकारकडनं. देवदासींच्या मुलींना पाटी-पुस्तकं मोफत मिळतात. शिवाय मुलीच्या लग्नासाठी दहा हजार रुपये देतं सरकार.

दारुड्या : आरारारा इपरीतच झालं म्हणायचं.

तरुण १ : बाई म्हातारी असो, निराधार असो, अपंग असो, नायतर टाकून दिलेली असो, तिला सरकारचं संरक्षण हाय, आधार हाय, मदत हाय !

दारुड्या : च्यामारी देवदासी प्रथा बंद झाली मग आता आमी जगायचं कसं ? सरकारचं नक्कीच डोकं फिरलंय (पुन्हा पितो)

तरुण १ : बाया आता पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून पुढं येताहेत. त्यांच्या विकासासाठी सरकार हजारो योजना राबवतंय. रोजगार हमी योजनेवर मजूर म्हणून काम करणाऱ्या बाईला बाळंतपणासाठी भर पगारी पंधरा दिवसाची रजा मिळती हे माहीत हाय का तुला ?

दारुड्या : आँ ? बाळंतपनासाठी भर पगारी रजा ?

तरुण १ : मातृत्व अनुदान योजना म्हणू नको, शिक्षण म्हणू नको, आरोग्य म्हणून नको, रोजगार म्हणू नको, उद्योग धंदे म्हणू नको, सगळीकडं महिलांना मदत देतंय सरकार. आन इतकंच न्हाय गड्या...दुर्दैवानं एखादी बाई बलात्काराची शिकार झाली, ॲसीड बिसीड टाकून तिचा चेहेरा येडा इद्रूप करण्याचा प्रयत्न झाला तर अशा बायांना भी मानानं जगता यावं म्हणून मनोधैर्य योजना जाहीर केलीय सरकारनं. लाखो रूपयाची मदत करणार आहे सरकार —आहेस कुठं तू ?

दारुड्या : खरं आसंल तुमचं म्हननं पर बाईशिवाय सगळं कसं मिळमिळीत वाटतंय बघा ! कायतरी मार्ग काढा आन् नाचायला एकतरी बाई बोलवा. बाई नाचली की जीवाला किती सुख वाटतंय म्हणून सांगू तुम्हाला...

तरुण १ : नाचाचा लई शौकिन दिसतो तू.

दारुड्या : नायतं काय ? मिशी फुटायच्या आधीपासनं तमाशा बघतो का न्हाय मी? तुमी बाईचं फक्त नाव घ्या सुरेखा पुणेकर, माया जाधव, मधु कांबीकर, माया खुटेगावकर, रेश्मा परितेकर झालीच तर...

तरुण १ : लहानपणापास्नं तमाशा बघतोस, मग नाचतापण येत असेल तुला?

दारुड्या : येत असेल म्हणजे काय ? बघायचं हाय का ?

तरुण १ : दाखव बरं ! सुरेखा पुणेकरसारखं नाचून दाखवायचं अगदी...

दारुड्या : हा.. तसं लगेच नाचता येतं व्हय ?

तरुण १ : मग ?

दारुड्या : तुमी लावणी म्हणायची आन् ढोलकी वाजवायची ! त्या शिवाय भूमिकेत शिरता येईल का मला ?

| | | |
|---|---|---|
| तरुण | : | बरं बरं (ढोलकी वाजते. घुंगराचा आवाज. मुली तालासुरात रंगवून रंगवून लावणी म्हणू लागतात.)<br>या रावजी, बसा भावजी<br>कशी मी राखू तुमची महरजी ?<br>(दारुड्या आश्चर्यकारकरित्या सुंदर नृत्य करुन दाखवतो सर्वजण टाळ्या — शिट्टया वाजवतात. टोप्या उडवतात) |
| तरुण १ | : | वा वा इतका सुंदर नाचलास तू... तू जर आमच्या नाटक कंपनीत आलास गड्या तर आम्हाला बाईची काहीच गरज राहणार नाही. 'बाई कशाला हवी' ? हे नाटक एकदम खऱ्या अर्थानं रंगतदार होईल बघ... |
| दारुड्या | : | आता आलं लक्षात तुम्ही फसवताय मला. दारु उतरली माझी समदी. (बाटली काढून पितो त्याला चढते.) पण मी असा फसणारा माणूस नाय. बाई नाय म्हण्ता म्हणजे काय ? इकडंची दुनिया तिकडं झाली तरी चालंल पन बाई पायजे म्हणजे पायजे. नाय तर आमच्या गावात तुम्ही नाटक करायचं न्हाय ? काय समजलं ? |
| तरुण १ | : | (पेचात घेत) एक बाई हाय... |
| दारुड्या | : | हां... आत्ता कसं वळणावर आलास. बोला... कुठाय ? बोलवा तिला लवकर... |
| तरुण १ | : | पण ती भारी पडेल तुमाला. |
| दारुड्या | : | काय बोलतो भादरा ? बाई कधी पुरुषाला भारी पडल का ? घेऊन ये तिला ! |
| तरुण १ | : | बघा, विचार करा... |
| दारुड्या | : | काय बी इचार करायची गरज न्हाय...(चेवात) आली अंगावर तर घेतली शिंगावर... (ढोलकी वाजते) |
| तरुण १ | : | अशी तशी बाई न्हाय ती. |
| दारुड्या | : | कशीबी असूदे, आना तिला ! |
| तरुण १ | : | स्वयंसिद्धा गटातली आहे ती. |
| दारुड्या | : | सोयंसिद्धा ! काय भानगड हाय ही ? |
| तरुण १ | : | गोरगरीब महिलाना स्वत:च्या संरक्षणासाठी ताकद द्यायची अशी योजना हाय सरकारची. |
| दारुड्या | : | (मोठ्याने हसतो) अशा योजना तयार करून बाया समर्थ झाल्या असल्या ना तर जग बदललं नसतं ? सरकारला आक्कल न्हाय हेच खरं. बोलवा तिला ! |
| तरुण | : | (गात) नव्या युगाची नवीन नारी<br>समर्थ आमुची शक्ती नारी<br>तिच्या स्वागतासाठी आता<br>सज्ज आमुची दुनिया सारी |

सर्व : (साथ देतात) नव्या युगातील नवी नारी ऽऽऽ

(तरुणांच्या मागून एक तरुणी पुढे येते. पांढरी निळ्या काठाची साडी. तेजस्वी डोळे, हसतमुख. ती हसत हसत पुढे येते सर्व तरुण तिला नमस्कार करतात. 'या मॅडम'. तीही सर्वांना नमस्कार करते.)

तरुणी : नमस्कार मंडळी ! कशासाठी बोलवलं ?

तरुण : याला बाई पाह्यजे होती...

तरुणी : बाई पाह्यजे होय ? (त्याच्या जवळ जात ठसक्यात) काय मग पसंत हाय का म्या?

दारुड्या : काय म्हणाला ?

तरुणी : पसंत हाय का ?

दारुड्या : (पागल होत)

फड सांभाळ तुऱ्याला गं आला ऽऽऽ

तुझ्या उसाला लागंल कोल्हा ऽऽऽ

(तिच्या जवळ जातो व गालावरुन हात फिरवतो. त्या बरोबर ती तरुणी कराटेचे पवित्रे घेत दोनतीन पेच टाकत त्याला लोळवते. इतर कलाकार हशा-टाळ्यांच्या गोंधळात तिला प्रोत्साहित करतात. शेवटी गोगलगाय होऊन तो हात जोडून)

दारुड्या : बस करा बाईसाहेब, बस करा...चूक झाली आपली.

तरुणी : काय बस करा ?

दारुड्या : डोळे उघडले आमचे, दारु पार उतरली.

तरुणी : अगदी पूर्ण उतरली का ?

दारुड्या : पूर्ण म्हणजे काय ? बाईच्या जागी पार आई दिसायला लागली.

तरुणी : (हसत) वा वा !

दारुड्या : (हात जोडत) अशीच असती आई अमुची

सुंदर रुपवती

आम्हीही सुंदर झालो असतो,

वदले छत्रपती...

तरुण : वा वा खरच उतरली म्हणायचं तुमची !

तरुणी : बाई ही केवळ उपभोगाची वस्तू नाही तर राष्ट्र निर्माणामध्ये भाग घेणारी मोठी शक्ती आहे हे लक्षात घ्या. जीजाबाईसारखी माता नसती तर शिवबा जन्माला आला नसता आन् सावित्री बाई फुले जन्माला आली नसती तर देशातली पहिली मुलींची शाळा पुण्यात निघाली नसती हे विसरू नका.

दारुड्या : अगदी सोळा आणे खरं हाय तुमचं म्हणणं.

तरुणी : गावकरी बंधूनो, महिला आता आपल्या खांद्याला खांदा लावून पुढं येताहेत. रेल्वे चालवताहेत, विमानं उडवताहेत, लढाईवर जाताहेत,

राजकारण, समाजकारण, सर्वच क्षेत्रात पुढं येताहेत. आपण त्यांना समजून घेतलं पाहिजे.आजपर्यंत आपण त्यांच्यावर अन्याय करत आलो पण आपण त्याना आता सन्मानानं वागवायला शिकवलं पाहिजे. सत्तेत अर्धा वाटा दिला पाह्यजे, काय ?

सर्व : हो हो बरोबर !

तरुणी : स्त्री आणि पुरुष ही संसाराची दोन्ही चाकं आहेत. ती बरोबर चालली तरच आपल्या संसाराचा आणि राज्याचा गाडा प्रगतीच्या पथावरुन पुढे जाईल, काय ?

सर्व : अगदी बरोबर !

तरुणी : त्यासाठी सरकार करत असलेले प्रयत्न आपण समजून घेतले पायजेत आणि त्याना साथ दिली पाहिजे, काय ?

सर्व : बरोबर.

तरुणी : मग आजपासनं आपण स्त्री आणि पुरुष यांची आघाडी करायची, काय?

सर्व : ठरलं !

तरुणी : आमच्या या नव्या आघाडीचा ऽऽऽ

सर्व : विजय असो ऽऽऽ

(सर्व जण गातात)

नव्या युगाची नवीन नारी
समर्थ आमुची शक्ती नारी
तिच्या स्वागतासाठी आता
सज्ज आमुची दुनिया सारी

*****